# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनामधील कार्यरत अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांकरिता कॅलिडा कनेक्ट प्रणित मानसिक आरोग्य व मानसिक तणाव व्यवस्थापन (Stress Management) या विषयावर दोन सत्रात प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न**

दिनांक ०७ जून २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या उपस्थितीत महापालिका आस्थापनामधील कार्यरत अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांकरिता कॅलिडा कनेक्ट प्रणित मानसिक आरोग्य व मानसिक तणाव व्यवस्थापन (Stress Management) या विषयावर दोन सत्रात प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाले. सदर प्रशिक्षणास महापालिका अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून चांगला प्रतिसाद दिला.

मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचा मानसिक तणाव दूर करून कार्यक्षमतेत आणि गुणवत्तेत वाढ व्हावी हे या कार्यशाळेचे विशेष उद्दिष्ट आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना कार्यशाळेत स्ट्रेस मॅनेजमेंट, कॉन्फीडन्स बिल्डींग, संस्थेतील आणि सामाजिक स्तरावरील संबंधाची जोपासना, आपले स्वतःचे व आपल्या संस्थेचे सर्वांगीण गोल सेटींग, ध्यान धारणा करुन संस्थेचा, आपल्या परिवाराचा सामाजिक स्तरावरील विकास साधणे या महत्त्वाच्या विषयांवर अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर मानसिक तणाव व्यवस्थापनासाठी (Stress Management) अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांकरिता विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटी घेण्यात आल्या.